महाराष्ट्र शासन

क्रमांक:एसटीसी३५९१/[४६९८] विशि-२
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

दिनांक:- २३ सप्टेंबर, १९९२

IQRA COLLEGE OF EDUCATION JALGAON

प्रति,

कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव

IQRA COLLEGE OF EDUCATION JALGAON

विषय :- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये[उर्दू मेथड] उघडण्यास परवानगी..

महोदय,

सन १९९२-९३ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करून ईकरा एज्युकेशन सोसायटी, जळगांव या संस्थेच्या १९९२-९३ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये [उर्दू मेथड] उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९८९ च्या कलम ५३[५ अ][सी][दोन] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
| --- | --- |
| जळगांव | अध्यापक महाविद्यालय [उर्दू मेथड ] |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :-

१] सदर महाविद्यालयास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

२] शासन पत्र क्र. एसटीसी २२८९/[१८८८]विशि-२, दि. २२. ६. १९९०मध्ये खाजगी अध्यापक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.

I/c.Principal
Iqra College of Education
Iqra Nagar, Shirsoli Road, Jalgaon

IQRA COLLEGE OF EDUCATION
JALGAON



३] सदर महाविद्यालयाची प्रवेशक्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास सदर महाविद्यालये रु. ३,६००/- शिक्षणशुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर अध्यापक महाविद्यालयातून पालन करण्यांत यावे.

४] स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठांकडून प्राप्त झाल्यावर कलम ५३[७] व [८] यानुसार अंतिम संलग्नीकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१] शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे

२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान], नाशिक विभाग, नाशिक

३] सचिव, ईकरा एज्युकेशन सोसायटी, जळगांव

४] मा. मंत्री [शिक्षण] यांचे स्वीय सहाय्यक.

५] निवड नस्ती/विशि-२

पार्सेकर २३. ९